म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ६१८

REFBK-0002859
REFBK-0002859

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. ५२८

करितां प्रचलित

विषयावर

# संजीवनपर

# मेळ्यांचीं पदें

REFBK-0002859
REFBK-0002859

भाग पहिला

सर्व बुकसेलरांकडे

किंवा

शिवाजी छापखाना, संगमनेर.

येथें मिळेल.

किंमत २ आणे

# दोन शब्द.

लोकमान्य टिळकानीं संघदेवता श्री गणरायाचे उत्साहाचा उपक्रम करून महाराष्ट्राला स्वावलंबन शिकविलें. लोकसंख्येचा जेथें एक दशांशहि सुशिक्षित नाहीं तेथें अन्य मार्गांनीं विचार क्रांति घडवून आणणें एक प्रकारे इष्ट असतें. मध्यम स्थितींतील मजुर वर्गांतील लोकांना पदें लावण्या इत्यादीकांनी देशांतील प्रचलीत विषयावर विचार करावयास लावणें हा एक उद्देश आहे. पुस्तकांतील पदें सर्वच अगदी सोप्या चालीवर बसविलेलीं असून तीं गातांना पेटी सारख्या जोड सुराचीहि जरूरी नाहीं. टिपऱ्या किंवा काठ्या यांच्या ठेक्यावर पदांतील अर्थबोध खड्या आवाजांत झाला तरी पुष्कळ कार्य होईल.

**दुरुस्ती:—** नजर चुकींचीं ऱ्हस्व दीर्घ सुधारून मग पदें बसवावीं.

| पान | ओळ | शुद्ध |
|---|---|---|
| ३ | पद ५ वें. | नमोस्तु |
| ४ | ४ | करुं |
| ५ | २ | अझुनी |
| ५ | ३ | चरू |
| ७ | शेवटची | मानिती |
| ८ | १ | मधीं |
| ८ | १४ | एसाजि, बाजि |
| १० | १६ | वरुनि |

# मेळ्यांचीं पदें.



पद १ लें. ( चाल—असा धरि छंद. )

प्रेमें गाऊं गणपति-गुण-गण गाऊं ॥ धृ० ॥

संघ-देवता गण नायक ही ।

कार्य-फलाची मूर्ति होई ।

कल्प-तरू सम ही फल दाई ।

सर्वहि ध्याऊं, गणपति-गुण गण गाऊं ॥ १ ॥

ऐक्य बुद्धिची प्राण प्रतिष्ठा ।

द्वैत—कुबुद्धी संहारीता ।

मोक्ष लाभ सुख देइ तत्वता ।

निष्ठा—ठेवूं, गणपति—गुण गण गाऊं ॥ २ ॥

मोक्ष सुखाचा अंतिम ठेवा ।

संघ—शक्तिनें जगतिं मिळावा ।

उत्कट इच्छा हृदयीं ठेवा ।

प्रेमें--सेवूं, गणपति--गुण गण गाऊं ॥ ३ ॥

पद २ रें [ चाल—गुन्हेगारी धन्याची, ] ताल धुमाळी

स्मरु सदा गंगाधर-बाळातें ।

ज्याचि भीति सकल-जन-पालातें ॥ धृ० ॥

पुण्याच्या पतनीं वजणाऱ्या पर्वतिच्या केसरिशीं ॥
संगति करुनि हस्ति-मुखानें जेरिस आणिलें अरिशीं॥१॥
गणनायक तो अरि संहरणीं आयुष्ये खपला ॥
हस्ति-मुखानें अरि जिंकुनी 'लोकमान्य' ठरला ॥ २ ॥

पद ३ रें [ चाल—असा धरि छंद, ]

हिंद सुतांहीं । सेवा-व्रत वरिलें पाहीं ॥ धृ० ॥
सुवर्ण-भूपद पुनः लाभण्या ॥
धन धान्याची वृद्धि होण्या ॥
अंतिमध्येया पूर्ण मिळविण्या ॥
कांक्षा मोठी । अक्षय देशहित पाठीं ॥ १ ॥
व्रत स्वदेशी कुणि चालविती ॥
बहिष्कार-बल कुणि दाखविती ॥
असहकारिता कुणि आचरिती ॥
पाहुनि मोठें । अनुपम व्रत नाहीं कोठें ॥ २ ॥
भंग कायदा करा म्हणोनी ॥
अनेक वीरा स्फुरण चढोनी ॥
मार्गे घेती उक्त न म्हणुनी ॥
कार्य यशास । जन सभेवरी विश्वास ॥ ३ ॥

पद ४ थें [ चाल—मी नव बाला जोगीन बनले, ]

गणपति बाली अम्हास जगतीं ॥
गान्हाणीं गाऊं तयाप्रती ॥ धृ० ॥

नाताळा संधि अन्य स्थळिं तैं ॥
सुखसंचारा बंदि अम्हाप्रती ॥ २ ॥
अपमानाची तिथें नोंदणी ॥
अस्पृश्यासम करणें वसती ॥ ३ ॥
समानतेचीं गोडवि गाणीं ॥
ठकवाया जित राष्ट्रांपुरतीं ॥ ४ ॥
स्वातंत्र्याचीं, सन्मानाचीं ॥
पदकें दिधलीं बालाहातीं ॥ ५ ॥
परि थोरांना कार्यारंभीं ॥
कारागृहवासाचि सजा तीं ॥ ६ ॥
मायबापसम नृपति परि तें ॥
"खोटें खोटें" जन वदताती ॥ ७ ॥
साम्राज्याचे घटक म्हणू तरी ॥
कोण भयंकर ही आपत्ती ॥ ८ ॥

पद ५ वें [ चाल—हमारा राम प्यारा है. ] कवाली

नमोस्तु हिंद-भूमीला ॥ नमोस्तु माय-भूमीला ॥
नमोस्तु देश-धर्माला ॥ नमोस्तु सत्य-धर्माला ॥ १ ॥
सुधन्या देश-भूमी ती ॥ सुधन्या माय भूमी ती ॥
सुदैवें जेथ जन्में मी ॥ सुखानें ठेवि देहा मी ॥ २ ॥
नमोस्तु पुण्य श्लोकांना ॥ सतींना आणि वीरांना ॥
स्वदेशा अर्पिती देहा ॥ स्वकार्यी ठेवुनी स्नेहा ॥ ३ ॥

पद ६ वें. [ चाल--गुन्हेगारी धन्याची ] ताल धुमाळी

करूं विचार ठरवूं शांत मनें ॥

धर्म सनातन आर्य भूमिचा रक्षू झटुनीया ॥
परधर्मांचा मारा चुकवूं विपदा टाळाया ॥ १ ॥
निजधर्माचें संशोधन करूं स्वधर्म नच सोडूं ॥
अनवस्थेची घडी मोडुनी, उत्तम स्थिति जोडूं ॥ २ ॥
राष्ट्र-भूमिवरि समान हक्का देउनिया सर्वां ॥
द्वैतबुद्धीला टाकून जिंकू परक्यांच्या गर्वा ॥ ३ ॥
अंत्यज आपुले देशबंधू त्या दूर नका लोटूं ॥
ऐक्य साधुनी एक दिलानें ध्येय चला गाठूं ॥
वीर मराठे, योजक ब्राह्मण, वैश्यहि प्रख्यात ॥
सर्व मिळूनी संमेलन तें होईल अपूर्वभूत ॥ ५ ॥
बलात्कारें अन्य मिषानें परधर्मी बनले ॥
स्वेच्छेनें त्या हिंदु बनवुनी घेऊं या सगळे ॥ ६ ॥
सदिच्छेचा, शांतपणाचा मार्ग खुला सगळ्यांना ॥
अत्याचारीं अधर्म नांदे नित्य ध्येय माना ॥ ७ ॥

पद ७ वे [ चाल---ही विशदता ]

ही अदयता सत्य विधिची ॥ केनियाच्या अपमानाची ।
मैत्री विफळ ती बलवंताची ॥ १ ॥ ही अदयता० ॥
शास्त्री गेले तडजोडीला । विन्मुख आले निज देशाला ॥
चिंता वाहुनि स्वस्थ पडतची ॥ २ ॥ ही अदयता० ॥

पद ८ वें [ चाल—चंद्रकांत राज्याची कन्या, ]

व्यापारानें परदेशीच्या देश बुडाला हा ॥
सुवर्णभूची रक्षा झाली, जागे अझुनि व्हा ॥ १ ॥
परके आले, चरु लागले, कुरण जसें हक्काचें ॥
दीन बुडाले, धनी खंकले, कारण हें दुःखाचें ॥ २ ॥
परदेशीचा रोग लागला साना-थोरांला ॥
विलायतेच्या वस्त्रा-वांचुनि नग्नपणा आला ॥ ३ ॥
मँचेस्टर तैं लँकेशायर लुटुनि धना नेती ॥
झोळी आली अमुच्या हातीं त्यांत दिसे माती ॥ ४ ॥
कधीं न आली स्थिती अशी ये दीना दुबळ्यांना ॥
प्रश्न बिकट हा संकट मोठें आहे सगळ्यांना ॥ ५ ॥
नको लढाई बंड नको तें, शस्त्रास्त्र घोर ॥
निश्चय करुनि वेष विदेशी टाका सारे पार ॥ ६ ॥
घटोत्कचाची माया सारी अजुनि तरी जागा ॥
तारण आतां हिंद भूमिला एकच हा बाणा ॥ ७ ॥
परावलंबन तोडायाला निश्चय शक्ति अनंत ॥
रिद्धि-सिद्धिचा दाता देवो, बनवो बलवंत ॥ ८ ॥

पद ९ वें [ चाल—तूं टाक चिरुनि ही मान, ]

नटलात कसें नादान ! नसे अभिमान ॥
कां त्याज्य वस्तुंनीं देहभूषवुनि इच्छिलसा सन्मान ॥ ध्रु० ॥
परदेशि वस्त्र विमलेलें ॥
सर्वांनि तुच्छ गणलेलें ॥

चरविनें त्याज्य ठरलेलें ॥

तें वस्त्र वापरुनि जगा दावुनीं इच्छुं नका सन्मान ॥ १ ॥

श्रेष्ठांनीं गरिबासाठीं ॥

स्वार्थास घालणें पाठीं ॥

शिकवणी देई जगजेठी ॥

हा सदाचार श्रेष्ठांनिं पाळितां इतरां तोचि प्रमाण ॥ २ ॥

सुमारें १५ वर्षां पूर्वीं, [प्रश्न] तरुणा तूं कोठें जासी इ. [उत्तर] 'जातसे ख्रिस्ति होण्याला, मज अन्न नसे खायाला' ह्या अर्थाचा संवाद असे. सांप्रत शुद्धि-चळवळ चालु असल्यामुळें बाटलेल्यांचे मनाची स्थिति काय असेल हे ह्या पद्यांत दाखविलें आहे.

पद १० वें [ चाल—बिन अबन तुलन करुणा. ]

हिंदुः—खिन्न कां, दिससि तरुणा ॥

रुदना, बघुनी, ये करुणा, सदय मना,

झाकिशी काय वदना ॥ १ ॥

बाटलेलाः—बाटुनी खचित फसलों ॥

मोहें, भुललों, ख्रिस्ताला, मिशनरिला,

टाकुनी कृष्ण, फसलों ॥

परधर्माची ही बेडी, तोडावी, मज गमते । संकटीं मी सांपडलों । ये यातूनी, काढि मला, हरि फसलों ॥ २ ॥

हिंदुः—सांगतों मार्ग तुजला ॥

सुहृदा, विपदा, तोडाया, मिशनरिचा ॥

मोकळा मार्ग सकला ॥

सत्य सनातन धर्माचीं, घेदीक्षा, शुद्धमनें, कर्माला
आचरुनी । घे, मानूनी सौख्यमना, भज हरिला ॥३॥
बाटलेला:—निज धर्माची ही थोरी। वर्णावी, कितिसदरीं
निजकर्मा, आचरलों । ये, मानूनी काढिमल्या,
हरि फसलों ॥ ४ ॥

कामदा.

हिंदु व बाटलेला:—आर्यधर्म हा हिंदु धर्म हा ॥
शिकवितो जगा श्रेष्ठता महा ॥
कीर्ति वर्णिता शेष भागला ॥
धर्म हा असे स्थान पावला ॥

पद ११ वें. [ चाल—बंजारा ]

श्री.ज.स.करंदीकर यांचा ता.८।८।२२ केसरीचा लेख वाचून

गण-नायक बलवंताला ॥ गाऊनि सांगु दुःखाला ॥धृ०॥
तुरुगांत राजकैद्यांची । स्थिति खडतर दुःखद साची ॥
ठेवितां पाय त्या ठायीं । अपमान भयंकर होई ॥
होतांना पहिली झडती । नग्नस्थिति येइ पुढती ॥
जनलज्जा मनलज्जेला । विसरणें भाग मनुजाला ॥१॥
विद्वान, सुशिक्षित, शूर । सद्धर्मि असे जरि पौर ॥
शिरजोर, दरोडेखोर । चोराहुनि अव्वल चोर ॥
अधिकारि मानीती त्याला । सुजनता जाई विलयाला ॥२

पिंजऱ्यामधिं कोंडोनी । अपमानिति अपशद्वांनीं ॥
अंधार कोठडी खाशी । मिळते ती कित्येकाशी ॥
ना धर्म कर्मही त्याला । सांगती मांस खाण्याला ॥ ३ ॥
जी माय बाप सरकार । इच्छिता कसा सहकार? ॥
यातना अशा या घोर । नरकाहुनी दुस्तर थोर ॥
भोगणें पडे लोकांला । कशि कदर नसे तुम्हांला ॥ ४ ॥

पद १२ वें. ( चाल—हे घनश्याम श्रीराम )

गडिमर्द मराठा वीर । खरा रणधीर ॥ धृ० ॥
स्वातंत्र्य सकलगुणनिधि रक्षुनि हिंद करी सुस्थीर ॥
प्राचीन राष्ट्र पुरुषांनीं । मिळविली ॥
स्वाधीन मध्य जेत्यांनीं । ठेवीली ॥
मावळे शिवाजी यांनीं । राखीली ॥
या आर्य भूमिंचे स्वतंत्रता जिंकुनि सदा नरवीर ॥ १ ॥
एसाजी, बाजी, तानाजी । वीरांनीं ॥
संताजि, धनाजि गाजी । सर्वांनीं ॥
महाराष्ट्र राखिला बाजी । झुंजोनी ॥
रोविला वीर रघु, शिंदे यांनिं झेंडा अटकेपार । २ ॥
शिकवुनी स्वजनता आज । प्रेमानें ॥
समतेचं पेरुनि बीज । न्यायानें ॥
दाखवा ऐक्यबल-तेज । नेटानें ॥
दुही सोडुनि जगा दाखवा महाराष्ट्र पदथोर ॥ ३ ॥

पद १३ वें [ चाल—जगिं दास होउनि आलों ]

प्रभु आनंदाचा कंद । सब दुनिया पालन वाला ॥ धृ०॥
प्रभुपदीं दुःख जीवीचें । सांगु या हिंद जननीचें ॥
विपदार्णवि तारीं सकला । करि विमुक्त मोहनलाला॥१॥
कुणि नाहिं अनाथा वाली । जनिं स्वार्थबुद्धि बोकळली॥
अवतार घेइ बनमाळी । धरि अधरिं मधुर मुरलीला ॥२॥
परकीय संस्कृती भवली । खाया ना भाकर उरली ॥
घनघोर विपत्ति आली । प्रभु तारि तारि सकलांला ॥३॥
स्वातंत्र्य-सूर्य मावळला । सुखसागर सारा सरला ॥
सौभाग्यतिलक पुसवटला । ये धावत मोहनलाला ॥ ४॥

पद १४ वें [चाल—गजल ]

देश माझा प्रिय मला हा । देश एकची आसरा ॥
जनकजननी त्यजुनि सारें जीव जेव्हां जातसे ॥
देश माझा अंतिं त्यातें सदय पोटीं घेतसे ॥
श्रीहरी परी नित्य मजसी देश माझा प्रिय असे ॥ देश०॥

पद १५ वें [ चाल—कशि मी त्यजूं पदाला ]

जनता जनार्दनाला । भजु भवभयहरणाला ॥ धृ० ॥
स्वर्लोकिं देव ना राहे । जनहृदयिं नित्य वसताहे ॥
निष्काम लोकसेवेनें । संतुष्ट होइ प्रभु तेणें ॥
सच्चिदानंद जगदीश । निजभक्ता दे स्वपदास ॥ १ ॥

१३, १४, १५, हीं पदें कवि रा. केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर यांच्या परवानगीनें छापलीं आहेत.

पद १६ वें. [ चाल—वरि गरिवा वीराजि अबला ]

जाळि मदीरा वपुधनदारा ॥ वपुधनदारा, वपुधनदारा ॥
जाळि मदीरा वपुधनदारा ॥ धृ० ॥
घोर कष्ट दे इष्ट जनाना ॥
स्वयें यातना भोगी नाना ॥ १ ॥
भिकेस लावुनि छी:थू:कारी ॥
पोंचवि अंतीं यमदरबारीं ॥ २ ॥
लोक नायकें बहुत प्रयत्नें ॥
दारूगुत्ते उठवुनि देणें ॥ ३ ॥
नीच नरपशु यमदूतानें ॥
चोरासम ती चोरुनि विकणें ॥ ४ ॥
निंद्यकृति याहून कोण ती ॥
नि:संशय त्या नरकप्राप्ती ॥ ५ ॥
आंग्ल शिष्ट ते आर्य म्हणविती ॥
मितपानाची स्तुती करीती ॥ ६ ॥
अमेरिकाती वरुनी प्रयत्ना ॥
करि बंदी जनि मद्य-सेवना ॥ ७ ॥

धडा घालुनी दे इतरांना ॥

लज्जा वाटो मनिं आर्यांना ॥ ८ ॥

पद १७ वें. [ चाल---पांडवा सम्राट पदाला ]

भारता स्वातंत्र्यशेला । पांघराया तूं घातला ॥

देशकाजीं लोकमान्या । देह आपुला तूं लाविला ॥

चंदनाची योग्य उपमा । भुवि सुगंधें दाटला ॥

पद १८ वें [ चाल---कधि मी त्यजू पदाला. ]

वसुधा कुटुंब ज्याला । जग आत्मसम तयाला ॥

भूलोकिं दिव्य देही तो । जनकाजिं नित्य रत होतो ॥

त्या लोकमान्य देहाला । पदप्राप्ति उत्तमा अचला ॥

श्रीगुरु महात्मा तोच । आदर्श जीवमात्रास ॥ १ ॥

पद १९ वें. ( चाल---संशय कां मनिं आला. )

संहतिच्या पथिं आतां । तारक तूं गणनाथा ॥ धृ० ॥

अनवस्था ही देशामाजी । काळ ये बिकटचि आता ॥१॥

परकीसत्ता हतबल करिते । हिंदभू करिसि सनाथा ॥२॥

मतामतांचा थोर गलबला । ऐक्य दे तिज बलवंता ॥३॥

रस्त्यानें म्हणावयाचें [ चाल—श्रीराम जयजय श्रीराम. ]

स्वधर्मशक्ति गणराया ॥ सदैक्यमूर्ति गणराया ॥

स्वराज्यप्रीति प्रभुराया ॥ आम्हास देई यासमया ॥

पद २० वें. [ चाल—अंकित पदांबुजाची दासी. ]

जनपदहितास राबे त्यासी ! मुळिं नसे, सौख्य धनराशि ॥
स्वयें कष्टुनी, अंतःकरणें, लावितसे इतरासि ॥ जन०
रात्रंदिन तो चिंतनिं मागे, दास्य-मुक्ति देशासि ॥ जन०
आत्मार्पणिं कधिं सिद्धचि होई, हानि परी कार्यासि ॥ जन०

पद २१ वें.

कळले लोकांना । सहकारी, परजनदास्यउदारा ॥
कळले लोकांना ॥ धृ० ॥
अजवरि शिणविला । झिजविला । देह सदा परक्यांच्या ।
भुलुनी वचनाला ॥ १ ॥
अनुभव पाहीला । राहीला । ठसुनी अंतःकरणा ।
कोणि न कोणाला ॥ २ ॥
पथिं कर्तव्याच्या । विसंबुनी । अन्यावरि जो बसे ।
त्याचे कार्य फसे ॥ ३ ॥
कष्टत जो गेला । तो चढला । ध्येयगिरीवर बसला ।
आयर्लंद भला ॥ ४ ॥
मिसरांचा देश । पाच्छाचा । ऐकुनिया उपदेश ।
स्वतंत्र तो झाला ॥ ५ ॥
पाही तुर्क सखा । जोमानें । अरिशी लढला देखा ।
विजयी तो झाला ॥ ६ ॥

# मेळ्यांचीं पदें.

2८५९



पद १ लें. ( चाल—असा धरि छंद. )

प्रेमें गाऊं गणपति-गुण-गण गाऊं ॥ धृ० ॥
संघ-देवता गण नायक हीं ।
कार्य-फलाची मूर्ति होई ।
कल्प-तरू सम ही फल दाई ।
सर्वहि ध्याऊं, गणपति-गुण गण गाऊं ॥ १ ॥
ऐक्य बुद्धिची प्राण प्रतिष्ठा ।
द्वैत--कुबुद्धी संहारीता ।
मोक्ष लाभ सुख देइ तत्वता ।
निष्ठा-ठेवूं, गणपति-गुण गण गाऊं ॥ २ ॥
मोक्ष सुखाचा अंतिम ठेवा ।
संघ-शक्तिनें जगतिं मिळावा ।
उत्कट इच्छा हृदयीं ठेवा ।
प्रेमें--सेवूं, गणपति--गुण गण गाऊं ॥ ३ ॥

पद २ रें [ चाल—गुन्हेगारी धऱ्याची, ] ताल धुमाळी

स्मरु सदा गंगाधर-बाळातें ।
ज्याचि भीति सकल-जन-पाळातें ॥ धृ० ॥

पुण्याच्या पत्तनिं वसणाऱ्या पर्वतिच्या केसरिशीं ॥
संगति करुनि हस्ति-मुखानें जेरिस अणिलें अरिशीं ॥ १ ॥
गणनायक तो अरि संहरणीं आयुष्यें खपला ॥
हस्ति-मुखानें अरि जिंकुनी 'लोकमान्य' ठरला ॥ २ ॥

पद ३ रें [चाल---असा धरि छंद, ]

हिंद सुतांहीं । सेवा-व्रत वरिलें पाही ॥ धृ० ॥
सुवर्ण-भूपद पुनः लाभण्या ॥
धन धान्याची वृद्धि होण्या ॥
अंतिमध्येया पूर्ण मिळविण्या ॥
कांक्षा मोठी । अक्षय देशहित पाठीं ॥ १ ॥
व्रत स्वदेशी कुणि चालविती ॥
बहिष्कार-बल कुणि दाखविती ॥
असहकारितां कुणि आचरिती ॥
याहुनि मोठें । अनुपम व्रत नाहीं कोठें ॥ २ ॥
भंग कायदा करा म्हणोनी ॥
अनेक वीरा स्फुरण चढोनी ॥
मार्ग घेती उक्त न म्हणुनी ॥
कार्य यशास । जन सभेवरी विश्वास ॥ ३ ॥

पद ४ थें [ चाल--मी नव बाला जोगीन बनले, ]

गणपति बाली अम्हास जगतीं ॥
गाऱ्हाणीं गाऊं तयाप्रती ॥ धृ० ॥

नाताळा मधिं अन्य स्थळिं तें ॥
सुखसंचारा बंदि अम्हाप्रती ॥ २ ॥
अपमानाची तिथें नोंदणी ॥
अस्पृश्यासम करणें वसती ॥ ३ ॥
समानतेचीं गोडविं गाणीं ॥
ठकवाया जित राष्ट्रांपुरतीं ॥ ४ ॥
स्वातंत्र्याचीं, सन्मानाचीं ॥
पदकें दिधलीं बालाहातीं ॥ ५ ॥
परि थोरांना कार्यारंभीं ॥
कारागृहवासाचि सजा तीं ॥ ६ ॥
मायबापसम नृपति परि तें ॥
"खोटें खोटें" जन वदताती ॥ ७ ॥
साम्राज्याचे घटक म्हणू तरी ॥
कोण भयकर ही आपत्ती ॥ ८ ॥

पद ५ वें [ चाल—हमारा राम प्यारा है. ] कवाली

नमोस्तु हिंद-भूमीला ॥ नमोस्तु माय-भूमीला ॥
नमोस्तु देश-धर्माळा ॥ नमोस्तु सत्य-धर्माळा ॥ १ ॥
सुधन्या देश-भूमी ती ॥ सुधन्या माय भूमी ती ॥
सुदैवें जेथ जन्में मी ॥ सुखानें ठेवि देहा मी ॥ २ ॥
नमोस्तु पुण्य श्लोकांना ॥ सतीना आणि वीरांना ॥
स्वदेशा अर्पिती देहा ॥ स्वकार्जीं ठेवुनी स्नेहा ॥ ३ ॥

पद ६ वें. [ चाल--गुन्हेगारी धन्याची ] ताल धुमाळी

करूं विचार दखवूं शांत मनें ॥

धर्म सनातन आर्य भूमिचा रक्षूं झटुनीया ॥
परधर्मांचा मारा चुकवूं विपदा टाळाया ॥ १ ॥
निजधर्मांचें संशोधन करूं स्वधर्म नच सोडूं ॥
अनवस्थेची घडी मोडुनी, उत्तम स्थिति जोडूं ॥ २ ॥
राष्ट्र-भूमिवरि समान हक्का देउनिया सर्वां ॥
द्वैतबुद्धीला टाकून जिंकू परक्यांच्या गर्वा ॥ ३ ॥
अंत्यज आपुले देशबंधू त्या दूर नका लोटूं ॥
ऐक्य साधुनी एक दिलानें ध्येय चला गाठूं ॥
वीर मराठे, योजक ब्राह्मण, वैश्यहि प्रख्यात ॥
सर्व मिळूनी संमेलन तें होईल अपूर्वभूत ॥ ५ ॥
बलात्कारें अन्य मिषानें परधर्मी बनले ॥
स्वेच्छेनें त्या हिंदु बनवुनी घेऊं या सगळे ॥ ६ ॥
सदिच्छेचा, शांतपणाचा मार्ग खुला सगळ्यांना ॥
अत्याचारीं अधर्म नांदे नित्य ध्येय माना ॥ ७ ॥

पद ७ वे [ चाल---ही विशदता ]

ही अदयता सत्य विधिची ॥ केनियाच्या अपमानाची ।
मैत्री विफल ती बलवंताची ॥ १ ॥ ही अदयता० ॥
शास्त्री गेले तडजोडीला । विन्मुख आले निज देशाला ॥
चिंता वाहुनि स्वस्थ पडतची ॥ २ ॥ ही अदयता० ॥

पद ८ वें [ चाल—चंद्रकांत राज्याची कन्या, ]

व्यापारानें परदेशीच्या देश बुडाला हा ॥
सुवर्णभूची रक्षा झाली, जागे अझुनि व्हा ॥ १ ॥
परके आले, चरु लागले, कुरण जसें हक्काचें ॥
दीन बुडाले, धनी खकले, कारण हें दुःखाचें ॥ २ ॥
परदेशीचा रोग लागला साना-थोरांला ॥
विलायतेच्या वस्त्रा-वांचुनि नग्नपणा आला ॥ ३ ॥
मँचेस्टर तैं लँकेशायर लुटुनि धना नेती ॥
झोळी आली अमुच्या हातीं त्यांत दिसे माती ॥ ४ ॥
कधीं न आली स्थिती अशी ये दीना दुबळ्यांना ॥
प्रश्न बिकट हा संकट मोठें आहे सगळ्यांना ॥ ५ ॥
नको लढाई बंड नको तें, शस्त्रास्त्र घोर ॥
निश्चय करुनि वेष विदेशी टाका सारे पार ॥ ६ ॥
घटोत्कचाची माया सारी अजुनि तरी जाणा ॥
तारण आतां हिंद भूमिला एकच हा बाणा ॥ ७ ॥
परावलंबन तोडायाला निश्चय शक्ति अनंत ॥
रिद्धि-सिद्धिचा दाता देवो, बनवो बलवंत ॥ ८ ॥

पद ९ वें [ चाल—तूं टाक चिरुनि ही मान, ]

नटलात कसें नादान । नसे अभिमान ॥
कां त्याज्य वस्तुंनीं देहभूषवुनि इच्छितसा सन्मान ॥ धृ० ॥
परदेशि वस्त्र विणलेलें ॥
सर्वांनि तुच्छ गणलेलें ॥

चरविनें त्याज्य ठरलेलें ॥
तें वस्त्र वापरुनि जगा दावुनी इच्छुं नका सन्मान ॥ १ ॥
श्रेष्टांनीं गरिबासाठीं ॥
स्वार्थास घालणें पाठीं ॥
शिकवणी देई जगजेठी ॥
हा सदाचार श्रेष्टांनिं पाळितां इतरा तोचि प्रमाण ॥ २ ॥

सुमारें १५ वर्षां पूर्वी, [प्रश्न] तरुणा तूं कोठें जासी इ. [उत्तर] 'जातसे ख्रिस्ति होण्याला, मज अन्न नसे खायाला' ह्या अर्थाचा संवाद असे. सांप्रत शुद्धि-चळवळ चालुं असल्यामुळें बाटलेल्यांचे मनाची स्थिति काय असेल हे ह्या पद्यांत दाखविलें आहे.

पद १० वें [ चाल—बिन अबन तुलन करुणा. ]

हिंदु:—खिन्न कां, दिससि तरुणा ॥
रुदना, बघुनी, ये करुणा, सदय मना,
झांकिशी काय वदना ॥ १ ॥
बाटलेला:—बाटुनी खचित फसलों ॥
मोहें, भुललों, ख्रिस्ताला, मिशनरिला,
टाकुनी कृष्ण, फसलों ॥
परधर्माची ही बेडी, तोडावी, मज गमते । संकटीं मी सांपडलों । ये यातूनी, काढि मला ,हरि फसलों ॥ २ ॥
हिंदु:—सांगतों मार्ग तुजला ॥
सुहृदा, विपदा, तोडाया, मिशनरिचा ॥

मोकळा मार्ग सकला ॥

सत्य सनातन धर्माची, घेदीक्षा, शुद्धमने, कर्माला आचरुनी । घे, मानूनी सौख्यमना, भज हरिला ॥३॥

बाटलेला:—निज धमाची ही थोरी। वर्णावी, कितिसदरीं
निजकर्मां, आंचरलों। ये, बातूनी काढिमला,
हरि फसलों ॥ ४ ॥

कामदा.

हिंदु व बाटलेला:—आर्यधर्महा हिंदु धर्म हा ॥
शिकवितो जगा श्रेष्ठता महा ॥
कीर्ति वर्णिता शेष भागला ॥
धर्म हा असे स्थान पावला ॥

पद ११ वें. [ चाल—बंजारा ]

श्री.न.स.करंदीकर यांचा ता.८।८।२२ केसरीचा लेख वाचून

गण-नायक बलवंताला ॥ गाऊनि सांगु दुःखाला ॥धृ०॥
तुरुगांत राजकैद्यांची । स्थिति खडतर दुःखद साची ॥
ठेवितां पाय त्या ठायीं । अपमान भयंकर होई ॥
होतांना पहिली झडती । नग्नस्थिति येइ पुढती ॥
जनलज्जा मनलज्जेला । विसरणें भाग मनुजाला ॥१ ॥
विद्वान, सुशिक्षित, शूर । सद्धर्मि असे जरि पौर ॥
शिरजोर, दरोडेखोर । चोराहुनि अव्वल चोर ॥
अधिकारि मानीती त्याला । सुजनता जाई विलयाला ॥२

तुरुंग्यामधिं कोंडोनी । अपमानिती अपशब्दांनीं ॥
अंधार कोठडी खाशी । मिळते ती कित्येकाशी ॥
ना धर्म कर्मही त्याला । सांगती मांस खाण्याला ॥ ३ ॥
जी माय बाप सरकार । इच्छिता कसा सहकार? ॥
यातना अशा या घोर । नरकाहुनी दुस्तर थोर ॥
भोगणें पडे लोकांला । कशि कदर नसे तुम्हांला ॥ ४ ॥

पद १२ वें. ( चाल--हे घनश्याम श्रीराम )

गडिमर्द मराठा वीर । खरा रणधीर ॥ धृ० ॥
स्वातंत्र्य सकलगुणनिधि रक्षुनि हिंद करी सुस्थीर ॥
प्राचीन राष्ट्र पुरुषांनीं । मिळविली ॥
स्वाधीन मध्य जेत्यांनीं । ठेवीली ॥
मावळे शिवाजी यांनीं । राखीली ॥
या आर्य भूमिंचे स्वतंत्रता जिंकुनि सदा नरवीर ॥ १ ॥
येसाजी, बाजी, तानाजी । वीरांनीं ॥
संताजि, धनाजि गाजी । सर्वांनीं ॥
महाराष्ट्र राखिला बाजी । झुंजोनी ॥
रोविला वीर रघु, शिंदे यांनिं झेंडा अटकेपार । २ ॥
शिकवुनी स्वजनता आज । प्रेमानें ॥
समतेचें पेरुनि बीज । न्यायानें ॥
दाखवा ऐक्यबल-तेज । नेटानें ॥
दुही सोडुनि जगा दाखवा महाराष्ट्र पदथोर ॥ ३ ॥

पद १३ वें [ चाल—जगिं दास होउनि आलों ]

प्रभु आनंदाचा कंद । सब दुनिया पालन वाला ॥ धृ०॥
प्रभुपदीं दुःख जीवीचें । सांगु या हिंद जननीचें ॥
विपदार्णवि तारीं सकला । करि विमुक्त मोहनलाला॥१॥
कुणि नाहिं अनाथा वाली । जनिं स्वार्थबुद्धि बोकळली॥
अवतार घेइ वनमाळी । धरि अधरिं मधुर मुरलीला ॥२॥
परकीय संस्कृती भवली । खाया ना भाकर उरली ॥
घनघोर विपत्ति आली । प्रभु तारि तारि सकळांला ॥३॥
स्वातंत्र्य-सूर्य मावळला । सुखसागर सारा सरला ॥
सौभाग्यतिलक पुसवटला । ये धावत मोहनलाला ॥ ४॥

पद १४ वें [ चाल—गजल ]

देश माझा प्रिय मला हा । देश एकची आसरा ॥
जनकजननी त्यजुनि सारें जीव जेव्हां जातसे ॥
देश माझा अंतिं त्यातें सदय पोटीं घेतसे ॥
श्रीहरी परी नित्य मजसी देश माझा प्रिय असे ॥ देश०॥

पद १५ वें [ चाल—कशि मी त्यजूं पदाला ]

जनता जनार्दनाला । भजु भवभयहरणाला ॥ धृ० ॥
स्वर्लोकिं देव ना राहे । जनहृदयिं नित्य वसताहे ॥
निष्काम लोकसेवेनें । संतुष्ट होइ प्रभु तेणें ॥
सच्चिदानंद जगदीश । निजभक्ता दे स्वपदास ॥ १ ॥

१३, १४, १५, हीं पदें कवि रा. केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर यांच्या परवानगीनें छापलीं आहेत.

पद १६ वें. [ चाल—धरि गरिबा वीराजि अबला. ]

जाळि मदीरा वपुधनदारा ॥ वपुधनदारा, वपुधनदारा ॥
जाळि मदीरा वपुधनदारा ॥ धृ० ॥
घोर कष्ट दे इष्ट जनाना ॥
स्वयें यातना भोगी नाना ॥ १ ॥
भिकेस लावुनि छीःथूःसारी ॥
पोंचवि अंतीं यमदरबारीं ॥ २ ॥
लोक नायकें बहुत प्रयत्नें ॥
दारूगुत्ते उठवुनि देणें ॥ ३ ॥
नीच नरपशु यमदूतानें ॥
चोरासम ती चोरुनि विकणें ॥ ४ ॥
निंद्यकृति याहून कोण ती ॥
निःसंशय त्या नरकप्राप्ती ॥ ५ ॥
आंग्लं शिष्ट ते आर्य म्हणविती ॥
मितपानाची स्तुती करीती ॥ ६ ॥
अमेरिकाती वरुनी प्रयत्ना ॥
करि वंदी जाणं मद्य-सेवना ॥ ७ ॥

धडा घालुनी दे इतरांना ॥
लज्जा वाटो मनिं आर्यांना ॥ ८ ॥

पद १७ वें. [ चाल---पांडवा सम्राट पदाला ]

भारता स्वातंत्र्यशला । पांघराया तूं घातला ॥
देशकाजीं लोकमान्या । देह आपुला तूं लाविला ॥
चंदनाची योग्य उपमा । भुविं सुंगधें दाटला ॥

पद १८ वें [ चाल---कशि मी त्यजू पदाला. ]

वसुधा कुटुंब ज्याला । जग आत्मसम तयाला ॥
भूलोकिं दिव्य देही तो । जनकाजिं नित्य रत होतो ॥
त्या लोकमान्य देहाला । पदप्राप्ति उत्तमा अचला ॥
श्रीगुरु महात्मा तोच । आदर्श जीवमात्रास ॥ १ ॥

पद १९ वें. ( चाल---संशय कां मनिं आला. )

संहतिच्या पथिं आतां । तारक तूं गणनाथा ॥ धृ० ॥
अनवस्था ही देशामाजी । काळ चे बिकटचि आता ॥१॥
परकीसत्ता हतबल करिते । हिंदभू करिसि सनाथा ॥२॥
मतामतांचा थोर गलबला । ऐक्य दे तिज बलवंता ॥३॥

रस्त्यानें म्हणावयाचें [ चाल-श्रीराम जयजय श्रीराम. ]

स्वधर्मशक्ति गणराया ॥ सदैक्यमूर्ति गणराया ॥
स्वराज्यप्रीति प्रभुराया ॥ आम्हास देई यासमया ॥

पद २० वें. [ चाल—अंकित पदांबुजाची दासी. ]

जनपदहितास रावे त्यासी । मुळीं नसे, सौख्य धनराशि ॥
स्वयें कष्टुनी, अंतःकरणें, लावितसे इतरासि ॥ जन०
रात्रंदिन तो चिंतनिं मागे, दास्य-मुक्ति देशासि ॥ जन०
आत्मार्पणिं कार्यि सिद्धचि होई, हानि परी कार्यासि ॥ज०

पद २१ वें.

कळले लोकांना । सहकारी, परजनदास्यउदारा ॥
कळले लोकांना ॥ धृ० ॥
अजवरि झिणविला । झिजविला । देह सदा परक्यांच्या ।
भुलुनी वचनाला ॥ १ ॥
अनुभव पाहीला । राहीला । ठसुनी अंतःकरणा ।
कोणि न कोणाला ॥ २ ॥
पथि कर्तव्याच्या । बिसंबुनी । अन्यावरि जो बसे ।
त्याचे कार्य फसे ॥ ३ ॥
कष्टत जो गेला । तो चढला । ध्येयगिरीवर बसला ।
आयर्लंड भला ॥ ४ ॥
मिसरांचा देश । पाळचा । ऐकुनिया उपदेश ।
स्वतंत्र तो झाला ॥ ५ ॥
पाही तुर्क सखा । जोमानें । अरिशी लढला देखा ।
विजयी तो झाला ॥ ६ ॥

REFBK-0002859
REFBK-0002859